RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Feb 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 Feb 2015

# अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : आठवा | फेब्रुवारी २०१५



**अमृतवेळ** (ध्यान-अभ्यासाविषयी संदेश) 5

**परमात्म्याचा शोध** (सत्संग) 9

**प्रश्नोत्तरे** (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 31

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



महाराज कृपाल सिंहजींच्या जन्मदिवसाच्या अनंत शुभेच्छा

# अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी ध्यान-अभ्यासाच्या कार्यक्रमाप्रारंभी प्रेमींना दिलेला एक महत्मपूर्ण संदेश

मी लहानपणापासूनच उदासी मतात वाढलेलो आहे. उदासी मताचा त्यागच शिकविला जात असे. कोणत्याही व्यक्तीच्या डोळ्यांकडे बघू नये मग तो पुरुष असो वा स्त्री असो. स्त्रीयांच्या बाबतीत तर आम्हाला अशी शिकवण दिली गेली होती की जर एखाद्या सापावर स्त्रीची सावली पडली तर साप देखील आंधळा होतो. आपण विचार करून पहा, ज्याच्याहृदयात लहानपणापासून अशा विचारांनी घर केले असेल तर त्याच्यावर काय परिणाम होईल?

जगात माझी स्थिती कोंबडीच्या अंड्याप्रमाणे होती. कोंबडी अंड्यास जवळ घेऊन त्यास उब देऊन त्यातून एक पिल्लू जन्माला घालू इच्छिते. तसेच माझ्या जीवनात महाराज कृपाल आले व त्यांनी मला आपल्या पंखाखाली, आपल्या छत्रछायेत ठेवले. महाराज कृपाल नेहमी सांगत असत,''मुला! जगात मिळून मिसळून चालले पाहिजे.'' त्यांच्या या सांगण्या मागे काय रहस्य होते मला माहित नव्हते. आपण नेहमी मला आलिंगन देऊन भेटायचात, तो आलिंगनाचा अनुभव शब्दांत वर्णन केला जाऊ शकत नाही.

जेव्हा अमेरिकन प्रेमींशी माझी पहिली भेट झाली, तेव्हा एक पती-पत्नी मला भेटावयास आले. मी पतीशी गप्पा मारत होतो, परंतु पतीला असे वाटले की मी त्यातूनच त्याच्या पत्नीला दया देत आहे. माझ्या मनात भीती निर्माण केली गेली होती की स्त्रीची सावली देखील चांगली नाही. मला जी शिकवण मिळाली होती, मी त्यात पक्का होतो. त्याच्या पत्नीने वैतागून एक अमेरिकन प्रेमी, ज्याला थोडी फार हिंदी येत होती व जो पप्पूच्या निकट होता, त्याला म्हणाली की जेव्हा मी पहिल्यांदा हिंदूस्थानात गेली होती, त्यावेळी तेथे मला वेळ घालवणे फार कठीण गेले, कारण संतजी माझ्या पतीला दया देत होते.



तिने मला नंतर लिहून देखील सांगितले की मी आपली प्रिय मुलगी आहे; काय आपण मला सरळ दया देऊ शकत नाही? पप्पूने ह्या गोष्टीचा उल्लेख माझ्याकडे केला. पप्पूला असे वाटत असे की ही निंदा करते. तेव्हा मी पप्पूला हसून म्हणालो,''ती जे बोलते आहे ते खरे आहे, परंतु ही माझ्या आवाक्यातील गोष्ट नाही.''

कोलंबियात महाराज कृपालजींची दया होती कारण संतांच्या दयेशिवाय संगतमध्ये इतकी भावात्मक उत्कंठा असणे असंभव असते. ती भावना एवढी प्रबळ होती की जो प्रेमी माझ्या कंबरेच्या जवळ होता तो माझ्या कंबरेचे चुंबन घेत होता, माझे हात ज्यांच्या हातात आले ते माझ्या हाताचे चुंबन घेत होते. माझे जे अंग ज्याच्या जवळ होते तो त्याचे चुंबन घेत होता. बाकी शेकडो प्रेमी एकमेकांचे चुंबन घेत होते की हा संतजींना स्पर्श करून आलेला आहे. अर्धा तासापर्यंत अशी भावनाप्रधान भेट चालू होती.

मी नेहमी सांगत असतो की संत झोपत नाहीत. ज्यांचा आत्मा तिसऱ्या तिळावरून खाली येतो, ते लोक झोपतात. संतांचा आत्मा वर असतो. त्यांचा चालता फिरता देखील आपल्या प्रिय गुरूंशी भेट-संवाद होत असतो. त्यावेळी

गुरू कृपाल स्वत:च दटावून सांगू लागले.''ह्यात तुझे काय नुकसान झाले आहे? तुला सर्वांशी मिळूनच चालले पाहिजे.'' यामुळे माझी याबाबतीतली भीडा संपली. आता मी संगतमध्ये ज्याप्रमाणे एका पतीला भेटतो त्याचप्रमाणे एका पत्नीला देखील भेटतो. आता या गोष्टीचा मला काहीही त्रास होत नाही पण पूर्वी ही माझ्या आवाक्यातील गोष्ट नव्हती. कारण मी अशाप्रकारेच आपले आयुष्य व्यतीत केले होते.

जेव्हा परमात्मा कृपालजींशी माझी पहिली भेट झाली तेव्हा मी रडून आपल्यास हेच बोललो की,''मी आपणांस एका कुमारी कन्येप्रमाणे भेटत आहे. मी आपले हृदय व मन सांभाळून ठेवले आहे.'' मला पहिल्या भेटीतच आपल्याशी छातीशी धरून मिळण्याची संधी मिळाली. नंतर आपण नेहमीच मला छातीशी धरून भेटत राहिलात. आता मी आपल्या दयेने प्रेमींशी मिळून मिसळून भेटतो. मी परमात्मा कृपालजींचे आभार मानतो की मला संगतमध्ये मिसळण्याचा त्यांचा हा मार्ग होता.

माझ्या वडिलांच्या घरी डाळिंब आणि आंब्याची बाग होती. जर आईने डाळिंब किंवा आंबा तोडून दिला असेल तर मी खाल्ला असेल. मला नक्कीच आठवण आहे की मी तेथेही आपला नियम सोडला नाही, मग जरी मी त्या बागेचा मालक होतो कारण भारतात ही प्रथा आहे की मुलगाच सर्व मालमत्तेचा मालक बनतो. त्यानंतर मी सरदार रतन सिंहाच्या बागेत देखील राहिलो आहे. तेथे लिंबू, मोसंबी व आंब्याची बाग होती. पण मी तेथेही आपल्या तत्वांशी पक्का राहिलो व आपल्या ध्यान-अभ्यासात मग्न राहिलो.

जो मनुष्य संसारीक नियमांचे पालन करू शकत नाही, तो अंतर्यातील नियमांचे पालन कसे करू शकेल? म्हणूनच मी विषय-विकारांना विष समजून त्यांपासून स्वत:चा बचाव करू शकलो. माझ्यावर त्या शब्दरूपी गुरू कृपालजींनी गुप्तरूपात तसेच प्रगट होऊनही दया केली. आजही त्यांच्या दयेचा वर्षाव होत आहे. आपणांसही त्यांचीच दया मिळत आहे.

प्रभू आणि गुरूंच्या प्रेमाचे शब्दांत वर्णन केले जाऊ शकत नाही. ही एक अकथनीय कथा आहे. आपणांस गुरु परमात्म्याच्या प्रेमाचा समज ज्यावेळेला येतो जेव्हा आपण अनुभव प्राप्त करतो. आपण अनुभव तेव्हाच प्राप्त करतो, जेव्हा आपण आपले मन बाह्यजगाच्या दिशेने पालटून अंतर्यात स्थीरावून टिकते. त्यानंतर संसाररूपी विषय-विकारांच्या बीजाची गरज नसते. हे एका मुक्याने साखर खाण्यासमान आहे. (जो साखरेचा स्वाद वर्णन करून सांगू शकत नाही) सतगुरू आपणांस प्रेमाची ही देणगी देतात, या वृक्षावर प्रेमाची फळे लागतात. जे शिष्य बाह्यरूपी जगातून आपले विचार अंतर्यात पलटतात. ते अंतर्यात गोड फळांचा रस प्राप्त करतात. कबीर साहेब म्हणतात,''मी ह्या फळाला चाखू शकलो नसतो, ही महिमा माझ्या सतगुरूंची आहे.''

गुरु नानक देवजी सांगतात,''मी कोणत्या मुखाने आपल्या गुरूंच्या महानतेचे वर्णन करू, ते सर्व कर्ते-करविते समर्थ आहेत. मी गुरूंचा आसरा घेऊनच विषय-विकारांच्या अग्नीपासून बचावलेलो आहे. म्हणूनच मी उठता-बसता, झोपेत-जागृतावस्थेत स्वत:देखील गुरु गुरु करतो व आपणांसही सांगतो की आपण देखील गुरु-गुरु करा.'' गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***कहो नानक प्रभ ऐह जनाई, बिन गुरु मुक्ति न पाईये भाई ।***

कबीर साहेब सांगतात,''कलियुगात गुरुंखेरीज नाम मिळत नाही व नामाशिवाय मुक्ती नाही. कलियुगात जर एखादे सर्वोत्तम साधन असले तर ते गुरूंची भक्ती व नामाची भक्ती आहे. आपणांस ही अत्यंत चांगली संधी लाभलेली आहे. आपल्या सतगुरूंनी आपणांवर अत्यंत अपार कृपा करून आपल्या आठवणीत बसण्याची संधी दिलेली आहे. तेव्हा डोळे बंद करून आपले नामस्मरण सुरू करा.

***

**संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान येथील कार्यक्रम**
**२७ फेब्रुवारी ते १ मार्च २०१५**
**३१ मार्च ते २ एप्रिल २०१५**

# परमात्म्याचा शोध

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, सूफीसंत शेख फरीद साहेबांची वाणी
मुंबई, महाराष्ट्र – ११ जानेवारी १९८७

मी यापूर्वी दोन–तीन सत्संगांमध्ये सांगितले आहे की ही संगतरूपी फुलबाग परमपिता बाबा सावन सिंहजी महाराजांची आहे. या महान संतांचा जन्म त्याकाळी झाला जेव्हा सामान्य लोक, महापुरुषांनी त्यांच्या वाणीरूपाने केलेला उपदेश सोडून प्रभु–परमेश्वराच्या चेतन स्वरूपाचा शोध दगडांमध्ये (मूर्तीत) तसेच पाण्यामध्ये (तिर्थस्थानात) घेऊ लागले होते. परमात्म्याचा वास कोठे आहे व त्यास कसे भेटावे याचा लोकांना विसर पडला होता.

ज्याप्रमाणे श्रावण ऋतुत पावसाचा वर्षाव होतो, त्याप्रमाणे महाराज सावन सिंहजी या जगात अवतरले. ज्या प्रांतात पाटबंधाऱ्यांची (कालव्यांची) सोय नसते त्या प्रांतातील लोक श्रावण ऋतुत पावसाची आतुरतेने वाट पाहत असतात. याचप्रमाणे परमात्माप्राप्तीची तहान लागलेल्या आत्म्यांची तहान भागविण्यासाठी परमात्म्याने सावनजींचा देह धारण केला आणि खरा भक्तीमार्ग विसरलेल्या जीवांना त्यांनी मार्गदर्शन केले, तसेच दगडाच्या मूर्तींची पूजा करून करून स्वत:च दगड झालेल्यांना त्यांनी स्वत:चे शिष्य बनविले.

सत्याचा मार्ग दाखवित आपण समजाविले की कोणत्याही प्रकारच्या रिती–रिवाजाने परमात्मा प्राप्त होत नाही. परमात्मा तुमच्या अंतर्यात असून तो तुमच्या प्रेमाचा भुकेलेला आहे. सर्व विश्वाचा एकच परमात्मा आहे. परमात्मा कोणत्याही समाजाची वा देशाची वैयक्तिक मालमत्ता नाही, तो सर्वांचाच आहे. सर्वांनाच परमात्मा प्राप्त करण्याचा अधिकार आहे. परमात्म्यास केवळ अमेरिकेतील लोक प्राप्त करू शकतात, हिंदुस्थानी लोक प्राप्त करू शकत नाहीत, असे नाही. परमात्मा सर्वांचाच असून जो त्यांचे चिंतन करतो, त्यास परमात्मा नक्की प्राप्त होतो.

आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत, ''भुकेलेल्यास भाकरी आणि तहानेलेल्यास पाणी नक्कीच प्राप्त होते, हा निसर्गाचा नियमच आहे.'' ज्या आत्म्यांच्या अंतरात परमात्माप्राप्तीची तळमळ होती, त्या आत्म्यांसाठी सावनजींच्या रूपाने परमात्मा या जगामध्ये आला व त्याने सर्वांना परमात्मा प्राप्तीचा मार्ग दर्शविला. त्यावेळी भडक विचारांनी प्रेरित झालेले काही धर्मांधक लोग महाराजांशी वितंडवाद करण्यासाठी येत, ते महाराजजींसमोर आपापल्या रितीरिवाजांचे, कर्मकांडांचे वर्णनदेखील करीत व म्हणत की आमच्याच पद्धती योग्य आहेत. अशावेळी महाराजजी म्हणत,''सत्य तुम्हीच तुमच्या नेत्रांनी पाहावे.'' ते लोक आश्रमासमोर वाद्ये वाजवून म्हणत की,''आम्ही अवलंब केलेल्या मार्गानेच परमात्मा प्राप्त होतो.'' तेव्हा महाराजजी हसून संगतला म्हणत,''ते पहा बंधुंनो! परमेश्वरास जागृत करणारे आले आहेत.'' महाराजजी त्यांस गुरू ग्रंथ साहेबमधील नमुद केलेली कबीर साहेबजींची वाणी सांगत:

***मुल्ला मनारे क्या चढ़े साईं न बहरा होय।***
***जां कारण तूं बांग दे दिल ही भीतर जोय।।***

तो परमात्मा बहीरा-मुका नाही. ज्याच्या प्राप्तीसाठी तू मोठमोठ्याने आवाज देत आहेस, तो परमात्मा तुझ्या अंतर्यामध्ये बसलेला आहे. तू विचार नंतर करतोस, त्याआधीच तो ऐकतो. आपणा सर्वांना कल्पना आहे की दान-पुण्य करावयाचे असल्यास, आपण एखाद्या धर्मस्थळी जातो. तेथे जाऊन ब्राह्मण-ज्योतिषांना विचारतो की, दान-पुण्य करण्यासाठी कोणती तारीख, तिथी, कोणता महिना योग्य आहे? परंतु पापकर्म करतेवेळी आई वडिलांचा सल्ला घेत नाही, तसेच पती पत्नीचा सल्ला घेत नाही; ज्याला संधी मिळते, तेव्हा तो त्या संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. तुम्हीच पहा! नि:संशयपणे आपण वाईट कर्मं लपून-छपून करतो, तरीही ती बाहेर प्रगट होते. त्या वाईट कर्मांची परतफेड आपण आजारपण, बेरोजगारी आणि अस्वस्थतेच्या रूपाने करीत आहोत. ही सर्व आपल्या वाईट कर्मांचीच शिक्षा आहे. या देहात राहून

जी काही थोडी-फार सत्कर्मे करतो, त्यांचे फळ म्हणून आपणांस सद्‌बुद्धी, निरोगी शरीर, चांगला रोजगार व सन्मार्गी लागलेली अपत्ये लाभली आहेत. परमात्मा आपल्या अंतरात बसून आपली प्रत्येक हालचाल पाहत आहे.

आज लोकांनी परमात्म्याचा शोध घेण्यात कोणतीही कसर बाकी ठेवली नाही. केवळ विशिष्ट वस्त्रे परिधान केल्याने जर परमात्मा भेटला असता तर यापेक्षा सोपा मार्ग दुसरा कोणता असू शकेल? आपण आपल्या मर्जीनुसार आपली वस्त्रे रंगवू शकतो. वस्त्रांचा उपयोग तर केवळ जगास आकर्षित करण्यासाठी होतो. परमात्मा मात्र कोणत्याही प्रकारचा वेष परिधान केल्याने प्रसन्न होत नाही. परमात्मा जर वेष परिधान केल्याने प्रसन्न झाला असता, तर बहुरूपी मंडळी कधी कसले रूप धारण करतात तर कधी कसले. त्यांनी परमात्म्यास वेशभुषेद्वारा मोहित करून स्वत:वर प्रसन्न करून घेतले असते. त्यांना जर परमात्मा लाभला असता, तर ते बिचारे दारोदारी पैसे-भिक्षा मागत का फिरत राहिले असते?

आपण सामान्य लोक एखाद्या तिर्थक्षेत्रातील पाण्याने स्नान केल्यास मुक्ती प्राप्त होते असे मानतो. परमात्मा जर अशा रीतीने स्नान करून मिळाला असता तर पाण्यात कायमस्वरूपी वास्तव्य असणारे बेडूक, मासे व इतर जीवांनी नक्कीच परमात्म्यास प्राप्त करून घेतले असते. ते बिचारे या योनींमध्ये का बरे हालअपेष्टा सहन करीत राहिले असते?

दान-धर्म केल्याने जर परमात्मा प्राप्त झाला असता तर तो धनाढ्य सावकारांना लाभला असता. वाचन-पठण केल्याने परमात्मा प्राप्त होत असता तर रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या चतुर लोकांनाच तो भेटला असता. भोळे लोक मात्र परमात्म्यास मुकले असते.

महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की, परमात्म्याने त्यास प्राप्त करण्याचे साधन व मार्ग स्वत:च्या मर्जीनुसार बनविलेला आहे, त्यामार्गास कोणीही कमी-जास्त करू शकत नाही. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

***जिसका गृह तिस दिया ताला, कुंजी गुरु सौंपाई।***
***अनिक उपाय करे नहीं पाय, बिन सतगुरु शरणाई।।***

ज्या परमात्म्याने हा देह बनविला आहे, त्या परमात्म्यानेच त्याच्या प्राप्तीच्या मार्गास कुलुपबंद केले आहे. ते कुलुप उघडण्याची चावी महात्म्यांच्या हाती देऊन परमात्मा त्यांना या जगात पाठवितो. ही चावी कधी गुरू नानक देवजींकडे, कधी कबीर साहेबांकडे तर कधी महाराज सावन सिंहजींकडे होती. परमात्मा त्याच्या मर्जीनुसार कुणासही ही चावी देऊन रवाना करू शकतो. आपण मन–बुद्धीच्या सहाय्याने कितीही प्रयत्न केले, तरी परमात्म्यास प्राप्त करू शकत नाही.

मला माझ्या जीवनात कर्मकांडे करण्याची खूप संधी लाभली. मला ते करण्याची आवड देखील होती. मी धुनीतप (चोहोबाजूंनी अग्नी प्रज्वलीत करून उन्हाळ्यात भर दुपारी केलेला तप), जलधारा (डोक्यावर पाण्याची धार सतत सोडून केलेला तप), वगैरे केले. ही कर्मकांडे मी अतिशय श्रद्धेने–विश्वासाने केली परंतु मला शांती व तृप्ती काही लाभली नाही. मला सतगुरू चरणी विनम्रतेने शीर झुकविल्यानंतरच शांती लाभली. कबीर साहेब सांगतात:

***ज्यों तिल माही तेल है ज्यों चकमक में आग ।***
***तेरा प्रीतम तुझमें जाग सके तो जाग ।।***

प्रियजनहो! ज्याप्रमाणे तीळामध्ये तेल असते, दगडामध्ये अग्नी असतो, फुलामध्ये सुगंध असतो, मेहंदीमध्ये रंग असतो, त्याचप्रमाणे परमात्मा तुमच्या अंतरामध्ये सामावलेला आहे. तुम्ही जर त्यास जागृत करून घेऊ शकत असाल तर घ्या, त्यास हाक देऊ शकत असाल तर द्या.

सर्व संत यागोष्टीवर एकमत आहेत की, आपला देह परमात्म्याचे निवास–स्थान म्हणजे मंदिर आहे. परंतु आपण हे मंदिर सोडून आपल्या स्वहस्तांनी बनविलेल्या मंदिरांमध्ये त्यास शोधण्याचा प्रयत्न करतो, म्हणून आपणांस मन:स्तापाशिवाय इतर कसलीच प्राप्ती होत नाही. तुम्हीच विचार करा, ही

मंदिरे का बनविली गेली? महात्म्यांनी या बाह्य जगातील मंदिरांची निर्मिती आपणांस समजावण्यासाठी केली की या मंदिरात स्वच्छता राखणे किती गरजेचे आहे, येथे धुम्रपान, मद्यपान व मांसाहार करू नये कारण हे परमात्म्याचे निवासस्थान आहे.

मंदिर, मस्जिद, गुरुद्वार आणि चर्च या सर्व ठिकाणी पाळले जात असलेले रीती–रिवाज एकाच प्रकारचे असतात. हिंदुंच्या मंदिरांमध्ये आपण जेव्हा दाखील होतो, तेथे घंटा लावलेला असतो, त्यातून घंटानाद करून आपण आत प्रवेश करतो. पुढे गाभाऱ्यामध्ये ज्योत प्रज्वलित करून ठेवलेली असते, आपण त्या ज्योतीचे दर्शन करतो. आपण मस्जिदमध्ये गेलो असता तेथे प्रज्वलित केलेले दिवे असतात, मौलवी मोठ–मोठ्याने बांग देत असतात. शिखांच्या गुरूद्वारामध्ये प्रवेश केल्यावर आढळते की तेथे शंखानाद केला जातो व तेथे एक रात्रंदिवस अखंडपणे तेवणारी ज्योत प्रज्वलित करून ठेवलेली असते. चर्चमध्ये गेलो असता दिसून येते की, तेथे लोक मेणबत्त्या प्रज्वलित करतात. प्रार्थना वा सर्व्हिस करण्यापूर्वी तेथे घंटांचा आवाज केला जातो. त्यामुळे सर्व धर्मांचे परमात्मा प्राप्तीसाठी केले जाणारे रीती–रिवाज साधारणपणे एकमेकांशी जुळणारे आहेत. सर्व धर्मांचे सत्य एकच आहे, ते म्हणजे **परमात्म्याचा शोध**.

आपण बाहेरील मंदिरांचा एवढा आदर करतो की तेथे आपण पादत्राणे घालून जात नाही. परंतु जे मंदिर परमात्म्याने बनविले आहे, जेथे तो स्वत: विराजमान आहे, त्या मंदिराचा आदर आपण करतो काय? आपण त्या मंदिरामध्ये कधी प्रवेश केला? त्याच्या स्वच्छतेकडे कधी लक्ष दिले? जर बाहेरील मंदिरात, मस्जिदमध्ये किंवा गुरूद्वारामध्ये एखाद्याच्या नजरचुकीने काही कमी–जास्त झाले, तर आपण परमात्म्याने घडविलेल्या देहरूपी हजारो हरि मंदिरांची (मनुष्यांची) हत्या करतो आणि मग धर्मसंरक्षणासाठी शहीद झाले असे म्हणतो.

तुम्हीच पहा! मनुष्य दगड–विटांवर प्रेम करतो. परंतु जी मंदिरे परमात्म्याने स्वत: घडवून त्यात तो स्वत: वास करतो, अशा मंदिरांची मात्र आपण घृणा करतो. फरीद साहेब सांगतात जर आपणांस परमात्म्यास प्राप्त करण्याची इच्छा असल्यास कोणाचेही हृदय दुखावू नका, हृदय दुखविण्या इतका दुसरा कोणताही मोठा गुन्हा नाही.

मी आपणांस दररोज फरीद साहेबजींची वाणी ऐकवत आहे. त्यांनी जंगलात फिरत खूप तप–साधना केली. परंतु परिपूर्ण सतगुरू भेटल्यानंतरच त्यांना जागृती आली. ज्या ठिकाणी फरीद साहेब तप करीत होते, तेथेच जंगल–पर्वतांमध्ये **परमात्म्याचा शोध** घेत असलेला एक शाह सरफ राहत होता. तो दररोज सर्वत्र फिरत असे तर फरीद साहेब एका जागेवर समाधिस्थ होत अंतर्यामध्ये जात असत.

त्यांचा आपापसामध्ये प्रेमपूर्वक वार्तालाप होत असे. एकदा फरीदसाहेब त्यास म्हणाले, ''हे शेट–सरफ तू जंगल–पर्वतांवर का वणवण भटकतोस? तो खुदा–परमात्मा तर तुझ्या अंतर्यातच आहे. तू काड्या–काटे तुडवित स्वत:चा वेळ का वाया घालवित आहेस?''

**फरीदा जंगल जंगल क्या भवह् वण कंडा मोड़ेंह् ।।**
**वसी रब हिआलीऐ जंगल क्या ढूंढेह् ।।**
**फरीदा इनी निक्की जंघीऐ थल डूंगर भविओम ।।**
**अज्ज फरीदै कूजड़ा सै कोहां थीओम ।।**

ज्यांनी ध्यान–अभ्यास, **परमात्म्याचा शोध** केलेला असतो ते कमी खातात, कमी बोलतात. त्यांना जाणीव असते की कशाप्रकारे मनाशी संघर्ष करावा लागतो. आपणांस कल्पना आहे की सुखाचा उपचार दु:ख आहे. प्रसुतीकळा सहन केल्याशिवाय आई बाळास जन्म देऊ शकत नाही. सोने मिळविण्यासाठी खाणीत खोदावे लागते तसेच मोती प्राप्त करण्यासाठी खोल

समुद्रामध्ये डुबकी मारावी लागते. त्याचप्रमाणे परमात्म्यास प्राप्त करण्यासाठी तर आपणांस बरेच काही त्यागावे लागते.

आपण जेव्हा जास्त अन्न खातो, तेव्हा आपणांस झोप येते, आळस येतो. आपण दुनियादार अन्न खाऊन खाऊन आपले शरीर स्थुल झालेले असते, आपण लठ्ठ झालेलो असतो, परंतु ध्यान-अभ्यास करणाऱ्यांचे शरीर दुबळे झालेले असते. फरीद साहेबांनी खूप तप-अभ्यास केलेला होता, त्यांचे शरीरदेखील तहान-भूक सहन केल्याने खूप सडपातळ व दुबळे झाले होते.

त्याकाळी प्रवासासाठी ट्रेन, कार वगैरे साधने नव्हती. प्रवास केवळ पायी चालूनच करावा लागत असे. फरीद साहेब म्हणत आहेत,''मी या जंगल-पर्वतांमध्ये पायी चालत-चालत खूप प्रवास केला. परंतु आज मी ध्यान-अभ्यासात बसू शकलो नाही, माझ्या शरीरात त्राणच उरले नाहीत.'' आपण आजारी असताना लघवी करण्याचे जवळच ठेवलेले पात्र अशक्तपणामुळे शंभर कोस दूर अंतरावर ठेवल्याप्रमाणे भासत होते. त्या वेळच्या स्वत:च्या अवस्थेचे वर्णन करीत आहात.

**फरीदा रातीं वडीआं धुख धुख उठन पास ।।**
**धिग तिना दा जीवया जिनां विडाणी आस ।।**

आपण प्रेमाने सांगत आहात की, सतयुग, द्वापर, त्रेता युगांमध्ये आपण दीर्घायुष्य जगलो, अनेक रात्री झोपून व्यतीत केल्या. जास्त वेळ झोपल्याने देखील कंबर दुखू लागते. या परक्या जगामध्ये गटांगळ्या खाणाऱ्या लोकांचा धिक्कार असो, कारण त्यांनी जीवनात **परमात्म्याचा शोध** घेतला नाही, परमात्म्याची भक्ती केली नाही, त्याची भेट घेण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांचे दीर्घायुष्य केवळ रात्री निद्रावस्थेमध्ये व्यतीत झाले. ज्यांना एखाद्या खटल्याच्या सुनवणीसाठी उपस्थित केलेल्या अपराध्याप्रमाणे वारंवार या जगात जन्म घेऊन यावे लागते, त्यांच्या जीवनाला काय अर्थ आहे?

आपलीदेखील तशीच अवस्था आहे की मृत्युनंतर धर्मराजाकडे जावे लागते. आपल्या कर्मांचा जमा-खर्च पाहून धर्मराज, त्यास योग्य वाटेल तो जन्म आपणांस देतो. आपण एखाद्या शरीरामध्ये प्रवेश केलेलाही नसतो, मृत्युदेवता त्यापूर्वीच आपल्या नेत्रांसमोर येतो. आपणांस एखाद्या दसनंबरी, सराईत गुन्हेगाराप्रमाणे कायमच हातकडी घातलेली असते. आपण अशा परक्या जगात स्थायी आहोत, जिथे आपला कोणीही मित्र-साथी नाही.

**फरीदा जे मैं होंदा वारया मित्ता आयड़या ।।**
**हेंड़ा जलै मजीठ ज्यों ऊपर अंगारा ।।**

ज्या जंगलात फरीद साहेब तपश्चर्या करीत असत, त्या जंगलात जस्सा लोहार स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी लाकडे तोडत असे. तो खूप वृद्ध होता. तो अनेकदा फरीद साहेबांकडे देखील जात असे. एके दिवशी लाकडे तोडत असताना त्यास उशीर झाला. त्याने विचार केला की, आपण आणखीन लाकडे तोडून रात्रीचा मुक्काम फरीद साहेबांकडेच करावा.

रात्री त्याने विचार केला की भोजनासाठी फरीद साहेब जे अन्न तयार करतील, तेच आपणदेखील खाऊ. आपण संसारी लोक विचार करतो की, ज्याप्रमाणे जेवणासाठी आपण भाकरी तयार करतो, त्याप्रमाणे हे फकीर देखील भाकरी तयार करत असावेत. परंतु फरीद साहेबांना त्यांचा ध्यान-अभ्यास प्रिय असल्याने ते त्यामध्येच लीन राहिले. जस्सा लोहार भोजनासाठी फरीद साहेबांच्या हाकेची वाट पाहत होता, की ते बोलावून म्हणतील प्रिय मित्रा! येऊन भोजन कर. परंतु खूप रात्र झाली, तो भूकेने कासावीस झाला तरीही फरीद साहेबांनी हाक न मारल्याने, त्याने स्वत:च भोजन मागितले.

फरीद साहेब हसून म्हणाले, ''हे प्रिय जस्सा! माझ्याकडे जर अन्न असते, तर मी तुला नक्कीच दिले असते. मी जर खोटे बोलत असेन तर माझे शरीर अग्नीमध्ये जळून जाईल. मी तुला सत्य सांगतो की मी परमेश्वराच्या

आसऱ्यावर येथे बसून आहे. मी ध्यान–अभ्यासासाठी येथे बसलेलो आहे, जर मला खाऊन झोपायचेच असते, तर मी घरीच राहू शकलो असतो.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत की, त्यांनी एकदा खूप दूरचा प्रवास केला. त्यांच्यासोबत एक प्रेमीदेखील होता. साधारणत: महाराज सावन सिंहजी आपल्या घरूनच अन्न सोबत घेऊन प्रवास करीत असत. केवळ तेच नव्हे तर महाराज कृपालदेखील उपहारगृहामधील अन्न खाणे पसंद करीत नसत. सोबत असलेल्या प्रेमीने विचार केला की महाराज सावन सिंहजी म्हणतील की आपण भोजन करुया. महाराजजींनी विचार केला की हा प्रेमी म्हणेल तेव्हा आपण भोजन करावे. सायंकाळी घरी परतले तेव्हा महाराज सावन सिंहजी म्हणाले, ''संत जेव्हा देहामध्ये राहण्याचा विचार करतील, तेव्हाच भोजनाचा विचार त्यांना सुचेल. त्यांना अंतर्यातून एक विशेष शक्ती तृप्त करीत असते. त्यामुळे ते जेव्हा शरीरामध्ये येतात, तेव्हाच त्यांना तहान–भूक लागते.''

**फरीदा लोड़ै दाख बिजौरीआ किक्कर बीजै जट ।।**
**हंढै उंन कताएंदा पैधा लोड़ै पट ।।**

फरीद साहेब सांगत आहेत, ''शेतकरी शेतामध्ये बाभळीचे बीज (एक कडू वनस्पती) पेरतो, परंतु त्यापासून बिजौर देशामध्ये मिळणाऱ्या मनुकांची अपेक्षा करतो, काश्मीरच्या सफरचंदांची अपेक्षा करतो. मेंढ्यांच्या लोकरीचा वापर करून तयार होणारी घोंगडी मऊशीर व्हावी अशी आशा करतो; असे कसे होऊ शकते?'' महात्मा आपणांस सांगतात :

***तारा मीरा साग बीजके स्वाद भालदा खीरां दे ।***
***जी लोचदा अम्ब खान नूं बीजे बीज करीरां दे ।।***

आपण सांगता, बंधु! तू जे काही पेरशील, त्यापासून प्राप्त होणारे फळ तुलाच खावे लागेल. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात :

***खेत शरीर जो बीजया सो अंत खलोया आए ।***

तुझ्या कर्मांच्या पिकाची कापणी तुलाच करावी लागणार आहे. या जगात आपण पाहतो की जो मिरच्यांची पेरणी करतो, त्यास मिरच्याच तोडाव्या लागतात. जो ऊस लावतो, त्यास मिरच्यांचे पीक कापण्यास मिळत नाही, त्यास ऊसाचीच कापणी कापावी लागते.

माझ्याकडे अनेक प्रेमी येऊन म्हणतात की आपण माझ्या अंतरातील पडदा दूर सारावा. मी त्यांना हाच सल्ला देतो की, तुम्ही ध्यान-अभ्यास करा. ते म्हणतात, ध्यान-अभ्यास तर आमच्याकडून होत नाही. आता तुम्हीच विचार करा, निद्रेच्या आधीन झालेल्या व्यक्तीच्या अंतरातील पडदा दूर होऊ शकतो का? जर एखादा शेतकरी झोपून राहिला, जमीनीची मशागत केली नाही तर तो शेती करण्यामध्ये यशस्वी होऊ शकतो का? जर कोणी व्यापारी म्हणू लागला की बाहेर जाऊन माल खरेदी करणार नाही, त्याचे योग्य मूल्य लावणार नाही, तर त्याचा व्यापार कसा चालेल?

**ही तर परमात्म्याची कृपा आहे की त्याने आपणांस नाम दिले आहे. आपणांस त्याचे काही मूल्य द्यावयाचे नाही. सकाळी उठून आपण ध्यान-अभ्यास करणे आपले कर्तव्य आहे. गुरू अमर देवजींकडे त्यांच्या काही शिष्यांनी येऊन विनंती केली की,''महाराजजी! आपण आम्हांवर कृपा करावी.'' ते शिष्यांना म्हणाले,''सर्वप्रथम तुम्ही अमृतवेळ पक्की करावी (दररोज पहाटे ३ ते ६ वाजेपर्यंत ध्यान-अभ्यासासाठी बसावे).''**

**फरीदा गलीए चिक्कड़ दूर घर नाल प्यारे नेंह ।।**
**चलां त भिजै कंबली रहां त तुट्टै नेंह ।।**

फरीद साहेबांच्या अंतरात तळमळ निर्माण झाली की माझा पडदा कधी दूर होईल, माझे कधी परमात्म्याशी मिलन होईल? आपण सांगता की गल्लीमध्ये चिखल आहे, परंतु प्रियकराशी स्नेह जुळला असून त्याच्या मिलनाची आस लागली आहे. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाररूपी चिखलाने

आपण बरबटलेले असून आपली बुद्धी पापांच्या भाराखाली दबली गेली आहे. मी जर येथे राहिलो तर माझा स्नेह तुटेल. परंतु माझी घोंगडी पापांमुळे खूप जड झाली आहे. पुढे आपण सांगता की, माझ्या घोंगडीवर खूप पापरूपी चिखल लागून ती कितीही जड झालेली असली, तरी शेवटी मी ज्याच्या आठवणीमध्ये बसलेलो आहे, तो स्वत:च ही घोंगडी स्वच्छ करेल व ज्या प्रिय सतगुरूंनी मला नाम दिले आहे, त्यांना मी जरूर अंतर्यात प्राप्त करून घेईन. शीख इतिहासात उल्लेख केलेला आहे की:

***सीधा जाण तो शेर जे रूक जावे, कौन आखदा मर्द दिलेर ओहनुं ।***
***तिल घांणी दी पीड़ तो डरे जे कर, कौन पुछदा विच बाजार ओहनूं ।***
***कंघी न हड्ड चिराए विच आरी, कौन सिर उते असवार करे ओहनूं ।***
***सिक्ख होकर धर्म नू लीक लावे, मुँह लावे न गुरु करतार ओहनूं ।।***

बंदुकीच्या गोळीचा आवाज ऐकून सिंह जर दुसऱ्या दिशेने पळाल्यास त्यास सिंह म्हटले जात नाही. ज्या दिशेने आवाज येतो, त्या दिशेने जाणे हा सिंहाचा धर्म असतो. तिळ घाण्याच्या वेदनेस घाबरल्यास, त्या तिळाचे बाजारामध्ये काय मूल्य? कंगव्याने आपली हाडे करवतीने चिरून घेतल्या शिवाय त्यास आपल्या शिरावर कोण ठेवेल?

शीख धर्मामध्ये जन्माला येऊनही, जो आपल्या धर्मास लांछन लावतो, त्यास सतगुरू जवळ करीत नाहीत. स्वत:चे बलिदान देऊनच आपण आपल्या प्रिय सतगुरूंना प्राप्त करून घेऊ शकतो.

**भिजौ सिजौ कंबली अल्लाह् वरसौ मेंह ।।**
**जाय मिलां तिनां सजणा तुटौ नाहीं नेंह ।।**

फरीद साहेब सांगत आहेत, ''माझी घोंगडी किती भिजून ओली झाली आहे याची मला काळजी नाही. मला कल्पना आहे की, नाम माझ्या सर्व पापांचा नाश करेल आणि माझे अंत:करण स्वच्छ करील.''

**फरीदा मैं भोलावा पग दा मत मैली होय जाय ।।**
**गहिला रूह न जाणई सिर भी मिट्टी खाय ।।**

आपण प्रेमाने सांगत आहात की, आपण जीव आपली वस्त्रे शुभ्र असण्याचा आणि आपल्याकडे असलेल्या धनाचा अहंकार करतो. कपडे खराब होतील असा विचार करीत सेवा करण्याचेदेखील टाळतो. असाही विचार करतो की, माझ्यासारख्या मोठ्या माणसाने एखाद्या साधारण व्यक्तीस कसे बरे भोजन वाढावे? परंतु ही माझ्या हृदयाची फसवणूकच होती. माझ्या गाफील मनास याची कल्पनादेखील नाही की माझे शरीर शेवटी मातीमध्ये मिसळून माती बनणार आहे. या शरीरापासून अधिकाधिक सेवा व नामस्मरण करून घेत अहंकार दूर सारल्यावरच आपणांस जाणीव होते की या शरीरापासून आपण कस-कसा फायदा करून घेणे गरजेचे होते?

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''जेव्हा गरीब व श्रीमंत एकाच चटईवर बसून जेवतात, तेव्हा गरीबांस उत्साह प्राप्त होतो, तर श्रीमंतांस झुकून नम्र होण्याची संधी लाभते. जेव्हा लहान-मोठे एकत्र येऊन सेवा करतो तेव्हा आपण सर्वांमध्ये उत्साह संचारतो. आपणांस नामाशी जोडणारी गुरूशक्ती हे पाहून प्रसन्न होते की, माझी मुले अहंकार दूर सारून साध-संगतची सेवा करण्यात मग्न आहेत.''

**फरीदा सक्कर खंड निवात गुड़ माख्यों मांझा दुध ।।**
**सभे वसतू मिट्ठीआं रब न पुजन तुध ।।**

फरीद साहेबांन आयुष्यभर ध्यान-अभ्यास केला. ते आपणा स्वादुजनांना सांगत आहेत, ''हे पहा बंधुंनो! साखर, खडीसाखर, मध हे सर्व पदार्थ गोड आहेत. परंतु तुम्ही जर नामाशी एकरूप झालात, त्यास तुमच्या अंतर्यात प्रगट करून घेतलेत तर त्याच्या मधुर स्वादासारखा दुसरा कोणताच स्वाद नाही. जी शक्ती नामरूपी अमृतामध्ये आहे, ती इतर कशातही नाही.''

**फरीदा रोटी मेरी काठ की लावण मेरी भुख ।।**
**जिनां खाधी चोपड़ी घणे सहनगे दुख ।।**

फरीद साहेब जंगलात राहत असत, त्यांना जेव्हा भूक अतिशय त्रस्त करीत असे, तेव्हा ते भाकरी भिक्षा मागून आणत असत. सुरुवाती-सुरुवातीला भूक मनुष्याला अतिशय त्रस्त करते. एका स्त्रीने फरीद साहेबांना टोमणा मारला की,''फकीर असून भिक्षा मागताना तुला लाज वाटत नाही का?''

फरीद साहेबांनी त्या स्त्रीला स्वत:ची व्यथा ऐकवली,''मी काय करू? मी खूप प्रयत्न करीत आहे. मी काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच डाकूंना काबूत आणले आहे. परंतु भूक काही कमी करू शकलो नाही.''

ती स्त्री म्हणाली, ''हे बघ फकीरा! मी गृहस्थी आहे, तू त्यागी आहेस, तरीही मी तुला एक सल्ला देते की भिक्षा मागण्याकरता जे भिक्षापात्र वापरतोस, ते दररोज घासून-घासून लहान करीत जा. भूक कमी झाल्याचे तुझ्या लक्षातही येणार नाही, कारण जे पात्र भरून दररोज तू अन्न ग्रहण करतोस ते घासून-घासून लहान होत जाईल.'' फरीद साहेब जस-जसे भिक्षापात्र घासत गेले, त्यांची भूक कमी-कमी होत गेली. अखेरीस एके दिवशी त्यांनी पूर्णपणे भूकेवर ताबा मिळवला.

फरीद साहेबांनी स्वत: जवळ लाकडाची भाकरी ठेवली होती. त्यांना जेव्हा भुकेची जाणीव होई, तेव्हा त्या लाकडी भाकरीचा ते चावा घेत असत. एकदा एका श्रीमंत मनुष्याने त्यांना भोजनाचे आमंत्रण दिले. त्यास फरीदसाहेब म्हणाले, ''बंधू! ही लाकडाची भाकरी माझे अन्न असून, भूक हीच तिची चव आहे. ज्या लोकांनी स्वादिष्ट अन्न ग्रहण केले व ध्यान-अभ्यास केला नाही, त्यांना अंतसमयी त्रास होईल. परमात्म्याचे प्रिय पुत्र त्याचे आभार मानतात.''

**रूक्खी सुक्खी खाय कै ठंडा पाणी पीओ ।।**
**फरीदा देख पराई चोपड़ी ना तरसाए जीओ ।।**

आपण सांगत आहात,''प्रिय मित्रा! तुझ्या नशिबात जेवढी धन-संपत्ती लिहिलेली आहे, तेवढीच धन-संपत्ती तुला मिळणार आहे. तू लोकांच्या महालांकडे, त्यांच्या वस्त्रांकडे पाहू नकोस व ते पाहून ह्रदयात तळमळू नकोस. तू परमात्म्याचा ध्यान-अभ्यास कर. ईश्वरी-इच्छेचा स्वीकार कर.''

**अज्ज न सुत्ती कंत स्यों अंग मुड़े मुड़ जाय ।**
**जाय पुच्छो डोहागणी तुम क्यों रैण विहाय ।।**

फरीद साहेब सांगतात, ''माझे आज परमात्म्याशी मिलन न झाल्याने माझ्या संपूर्ण शरीरास प्रचंड वेदना होत आहेत. मी त्या विधवा आत्म्यांना विचारते की जे कायमस्वरूपी परमात्म्यास दुरावले गेले आहेत, ते त्यांच्या आयुष्यातील रात्री कशा तऱ्हेने व्यतीत करतात?''

सुरुवाती-सुरुवातीला मनास ध्यान-अभ्यासाकडे आणणे अतिशय अवघड जाते. त्यास परमार्थाची आवड नसते, ध्यान-अभ्यासात रस नसतो. परंतु जेव्हा मन येथे रमते, तेव्हा ध्यान-अभ्यास त्यागणे अतिशय अवघड असते.

आपण पाहतो की नुकताच जन्म झालेल्या मुलास कल्पना नसते की आईच्या स्तनामध्ये माझे मधुर अन्न आहे, त्यामुळे सुरुवातीला तो आईचा स्तन पकडत नाही, पकडल्यास तो ते दाबत नाही, स्वत:चे मुख दुसरीकडे नेतो. आई स्वत:च स्तन बाळाच्या तोंडाकडे नेते. वासरू असल्यास आपण त्याचे तोंड पकडून ते गाईच्या स्तनांकडे नेतो. परंतु एकदा का त्या दुधाची चव त्या वासरास कळली की मग त्यास आवरण्यासाठी रस्सीने बांधून ठेवावे लागते. त्याची कधी चुकूनही रस्सी सुटून सुटका झाली, तर ते सर्व दुध पिऊन टाकते, घरातील लोक केवळ पाहातच राहतात. अशीच अवस्था आपल्या बाळांची देखील असते. हीच अवस्था ध्यान-अभ्यास करणाऱ्या अभ्यासींची असते. सुरुवाती-सुरुवातीला ध्यान-अभ्यास करणे अवघड जाते. त्यावेळी आपण म्हणतो झोप येते. ही अवस्था जे अंतर्यामध्ये गेले नाहीत,

त्यांची असते. परंतु ज्यांना रस येतो, त्यांना ध्यान–अभ्यास सोडणे कठीण जाते. गुरू अर्जुनदेवजी महाराज आपल्या ध्यान–अभ्यासाचे वर्णन करतात:

***वध सुख रैनड़िऐ पिर प्रेम लगा, घट दुख निंदड़िऐ पिर स्यों सदा पगा ।।***

हे रात्री! तू मोठी हो. कारण दिवस उजाडल्यावर या जगातील कामे मला थकवून टाकतील, संसारीक लोकांच्या भेटीगाठी होतील. निद्रेस ते सांगतात की तू दु:खांना आमंत्रण देतेस म्हणून तू कमी हो. ध्यान–अभ्यास करणारे अभ्यासी तर म्हणतात की एक रात्र सहा महिन्यांची व्हावी, कारण ध्यानाद्वारे आम्ही आमच्या प्रिय–गुरूंच्या भेटीत तल्लीन असतो. गुरू नानकदेवजी महाराज त्यांच्या ध्यान–अभ्याससंदर्भात खूप प्रेमाने सांगतात:

***इक तिल प्यारा बिसरे भक्त कनेही होय ।***

एका क्षणासाठी जरी भक्त परमात्म्यापासून दुरावला तरी त्याच्या प्रेमामध्ये खंड पडतो. मी त्या विधवा आत्म्यांना विचारते की, तुमचे कधीच त्या परमात्म्याशी मिलन झालेले नसल्याने तुमच्या आयुष्यातील रात्री कशा बरे व्यतीत होतात? गुरू नानक देवजी महाराज सांगतात:

***अमली जिए अमल खाए, त्यों हर जन जिए नाम ध्याए ।***

ज्याप्रमाणे नशा करणाऱ्याचे जीवन अंमली पदार्थांमध्ये असते, त्याचप्रमाणे ध्यान–अभ्यास करणाऱ्या अभ्यासीचे जीवन त्याच्या अभ्यासामध्ये असते.

## साहुरै ढोई ना लहै पेईऐ नाहीं थाओं।।
## पिर वातड़ी न पुछई धन सोहागण नाओं।।

आता आपण प्रेमाने सांगता की हे जग आत्म्यासाठी सासर आहे. ज्या सचखंडामध्ये परमात्मा वास करतो, तो सचखंड आत्म्यासाठी माहेर आहे. आत्मा सचखंडापासून दुरावून, येथे सासरमध्ये रममाण झाला आहे. ज्याप्रमाणे आपल्या मुली त्यांच्या विवाहानंतर एक रात्रही वडिलांच्या घरी राहण्यास राजी नसतात, कारण त्यांना सासरच प्रिय वाटत असते.

साधारणपणे धर्माचे नेतृत्व स्वतःकडे घेतलेले लोक स्वतःस गुरूमुख म्हणवितात. ते म्हणतात आमचे देखील गुरू आहेत, म्हणून ते स्वतःस सुवासिनी म्हणवितात. परंतु त्यांचे खरेतर परमात्म्याशी कधीच मिलन झालेले नसते. आयुष्यात ज्या महात्म्याचा त्यांनी आधार घेतलेला असतो, त्या महात्म्यास त्यांनी कधीच पाहिलेले नसते. अशा लोकांसंदर्भात गुरू नानक देवजी महाराज त्यांच्या वाणीमध्ये लिहितात:

***नन्ना नाहें भोग नित भोगे, ना डिठ्ठा न संभलया ।***
***गल्ली हों सोहागण भैंणे, कंत न कबहूं मैं मिलया ।।***

असे लोक म्हणतात की, आमच्याकडे नाम आहे, परमात्मा आमच्या जवळ आहे, परंतु खरेतर त्यांचे पती परमात्म्याशी भेट झालेली नसते. त्यास कधीही विचारलेले नसते की तू माझ्यावर खूष आहेस की नाराज आहेस? ते स्वतः भ्रमात असतात व इतरांनाही भ्रमात पाडतात. ते स्वतःचे जीवन वाया घालवितातच, इतरांचे जीवनदेखील व्यर्थ घालवितात. म्हणून अशा लोकांच्या बाबतीत गुरूसाहेब म्हणतात, ज्यांना कोणी गुरू लाभलेले नसतानाही ते स्वतःस सुवासिनी म्हणवून घेतात, असे आत्मा धन्य आहेत.

**साहुरै पेईऐ कंत की कंत अगम अथाह ।**
**नानक सो सोहागणी जो भावै बेपरवाह ।।**

गुरू नानक देवजी महाराज सांगतात की जे आत्मा येथे सासरी येऊनही अंतर्यात जाऊन आपल्या परमात्म्यामध्ये लीन झालेल्या आहेत, तेच आत्मा खरे सुवासिनी आहेत. जे आत्मा परमात्म्याच्या पसंतीस उतरले, त्याच्या निवडीत आले, त्या आत्म्यांच्या चरणांचे चुंबन घेण्यासदेखील मी तयार आहे. ज्या आत्म्यांना त्या परमात्म्याच्या घरी जाण्यास परवानगी मिळते, परमात्मा त्याच आत्म्यांना नाम देतो व त्यांच्याच अंतरामध्ये नामाचा जप करण्याची ओढ निर्माण करतो. परमात्मा स्वतःच त्यांना नाम घेण्यास प्रेरित करतो. मुक्ती केवळ नामातच आहे.

तुम्ही गुरू नानक देवजींची वाणी, कबीर साहेबजींची वाणी आणि इतर महात्म्यांचे धर्मग्रंथ वाचून स्वत:ची खात्री पटवून घेऊ शकता, सर्व महात्मे हेच सांगतात की,''आपले सौभाग्य असल्यास, आपणांस सत्संग लाभतो. त्यापेक्षाही आपले भाग्य उच्च असल्यास, आपल्या लक्षात येते की महापुरुष सत्संगात कोणता संदेश देत आहेत? आणि त्यापेक्षाही उच्च भाग्य असल्यास आपल्या हृदयामध्ये नाम प्राप्त करून घेण्याची इच्छा निर्माण होते, ही वस्तु केवळ भाग्यानेच लाभते.'' गुरू नानक देवजी महाराज प्रेमाने सांगत आहेत:

***पूर्व कर्म अंकुर जब प्रगटे, भेटया पुरुष रसिक बैरागी***
***मिटया अंधेर मिलत हर नानक जन्म जन्म की सोई जागी ।।***

आपली एखाद्या साधूशी झालेली भेट हे आपल्या जन्मोजन्मांतरीच्या सत्कर्मांचे परमात्म्याने दिलेले फळ असते. आपण त्या भेटीचा फायदा करून घेत नाम प्राप्त करतो, ज्यामुळे जन्मोजन्मांतरापासून निद्राधीन असलेला आपला आत्मा जागृत होतो. आपण म्हणतो की, आम्ही जागृत आहोत, पण तसे नाही. आपण जगाच्या दृष्टीने जागृत असलो, तरीही परमात्म्याच्या दृष्टीने झोपलेलेच आहोत.

सच्चखंड प्रलय-महाप्रलयातही नाश पावत नाही. आपणांस सच्चखंडाची काळजी नाही, परंतु आपण याजगातील नाशिवंत घरांची मात्र चिंता करतो, जी आपण शेवटी सोडून जाणार आहोत. यापेक्षा आपण अधिक कोणत्या गाफील निद्रेमध्ये असू शकतो?

**नाती धोती संबही सुत्ती आय नचिंद ।**
**फरीदा रही सो बेड़ी हिंड दी गई कथूरी गंध ।।**

फरीद साहेब सांगत आहेत, ''परमेश्वराने कृपा केली व आपणांस नाम दिले. ज्याप्रमाणे आपण घर व अंगण झाडूच्या मदतीने स्वच्छ करतो, त्याचप्रमाणे नामस्मरण आपल्या आत्म्यास स्वच्छ करते. परमात्मा कधीही आपणांस विचारत नाही की तू स्नान केले आहेस का? तुझा साज-शृंगार सुंदर आहे

का? त्याने केवळ माझे प्रेम पाहिले. अंतरामध्ये माझ्या प्रेमाचे बक्षिस देत स्वत:शी मिलन घडविले. आता मी त्याच्या दारी निश्चिंत होऊन झोपले आहे की मी आपल्या घरी पोहोचले आहे.''

ज्याप्रमाणे कस्तुरीच्या जवळ थोडासा हींग ठेवल्यास, कस्तुरीचा सुवास नाहीसा होतो, त्याचप्रमाणे ज्यांच्या अंतरात अहंकार आहे, त्यांची नाव या संसाररूपी समुद्रात हिंदकाळे घेत आहे. अहंकारच आपल्या अंतरात परमात्मा व आत्मामध्ये भिंत बनून उभा राहतो. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

***हौं विच आया हौं विच गया, हौं विच खटपा हौं विच गया ।***
***हौं विच जम्या हौं विच मुआ, हौं विच स्वर्ग नर्क अवतार ।।***

हा मी–मोठेपणा–अहंकारात जन्मतो आणि अहंकारातच मृत्यु पावतो, अहंकारामुळेच या जगामध्ये वारंवार ये–जा करतो. पुढे आपण सांगता :

***हौमैं बूझे तां दर सूझे, ज्ञान बिहोणा कत कत लूझे ।***

अहंकार काय आहे? त्याची निर्मिती कशी होते? त्यावर उपाय काय आहे? हे आपण समजून घेणे अतिशय गरजेचे आहे.

***होमैं दीर्घ रोग है, दारू भी इस माहे ।***
***कृपा करे जे आपणी ते गुरु का शब्द कमाहे ।।***

अहंकार हा इलाज नसलेला मधुमेह आहे. तो मनुष्याचा अंतरामधूनच नाश घडवितो. परंतु मनुष्याच्या लक्षातही येत नाही की कोणती वस्तू त्याचा अंतरामधून विनाश घडवित आहे? ज्यांच्यावर परमात्मा कृपा करतो, त्यांना तो नाम–भक्ती मार्गामध्ये आणतो. जशी–जशी आपण शब्द–नामाची कमाई करतो, तसे–तसे आपण परमात्म्याच्या समिप जात असतो.

मी नेहमी सांगत असतो की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची मूळ–गाठ आपल्या दोन्ही नेत्रांच्या दरम्यान, मागील बाजूस, त्रिकुटीमध्ये आहे. जोपर्यंत आपण आपल्या आत्म्यावरून स्थुल, सूक्ष्म आणि कारण हे



तीनही पडदे दूर सारत नाही व आत्म्यास दशमद्वारी घेऊन जात नाही, तोपर्यंत आपण अहंकारापासून आपली सुटका करवून घेऊ शकत नाही.

**जोबन जांदे ना डरां जे सह प्रीत न जाय।।**

**फरीदा कितीं जोबन प्रीत बिन सुक गए कुमलाय।।**

फरीद साहेब सांगत आहेत,''मी माझे यौवन सरताना पाहूनही घाबरत नाही, तारुण्य जाऊन भलेही वृद्धापकाळ समित येत आहे, परंतु मला भीती वाटते की, माझे गुरू-परमात्म्याशी असलेले प्रेम मात्र नाहीसे होऊ नये. जशी शेती पाण्याशिवाय कोमेजून जाते, तसे गुरूप्रेम न मिळाल्याने अनेक यौवनप्राप्त लोक या जगात येऊन कोमेजून गेले.''

**फरीदा चिंत खटोला वाण दुख बिरह विछावण लेफ।।**

**एह हमारा जीवणा तू साहिब सच्चे वेख।।**

आता फरीद साहेब स्वतःतर्फे शब्द–गुरूंसमोर विनंती करीत आहेत, ''तुझ्यावरील प्रेम सातत्याने राहवे या चिंतेचा माझा बिछाना आहे. ध्यान–अभ्यासामध्ये जे पापरूपी काटे टोचत होते ते चारपाईच्या रस्सीसमान होते तर विरहाचा माझा बिछाना आहे. हे प्रिया! हे सर्व माझ्या आयुष्यामध्ये घडत आहे. तू एक दृष्टीक्षेप टाकून तर बघ की, आम्ही जगाच्या प्रेमामध्ये दंग आहोत की तुझ्या प्रेमामध्ये मग्न आहोत? आम्ही तर तुझ्या दुःखांनाही तुझ्या प्रेमासमान समजत आहोत.''

गुरू गोविंद सिंहजी जेव्हा आनंदपूर येथील किल्ला सोडून आले तेव्हा त्यांच्या विरोधकांनी त्यांच्या दोन मुलांना भिंतीमध्ये निर्घृणपणे चिनले होते तर दोन मुलांना त्यांच्या डोळ्यांसमोर निर्दयपणे हुतात्मा केले होते. त्यांच्या पायांमध्ये पादत्राणे देखील नव्हती तरीही त्यांनी परमात्म्याचे आभार मानले होते. तेव्हा त्यांनी ही वाणी म्हटली होती:

***मित्र प्यारे नूं हाल मरीदा दा कहना ।***<br>***तुध बिन रोग रजाईयां दे ओढण नाग निवासा दे सहना ।***<br>***सूल सुराही खंजर प्याला विंग कसाईयां दा सहना ।***<br>***यारड़े दा सानूं सत्थर चंगा ते भटखेड़यां दा रहना ।।***

आपण त्या वैराग्य अवस्थेमध्ये परमात्म्यास संदेश देत आहात की आमच्यासाठी जमिनीवर झोपणे बादशाही सिंहासनापेक्षाही श्रेष्ठ आहे. दुःख येवोत वा सुखं येवोत, परमात्म्याचे प्रेमी आपल्या प्रेमामध्ये कधी कमतरता येऊ देत नाहीत, किंबहुना आपले प्रेम आणखीन मजबूत करतात.

**बिरहा बिरहा आखीऐ बिरहा तू सुलतान ।।**<br>**फरीदा जित तन बिरह न ऊपजै सो तन जाण मसान ।।**

आता आपण प्रेमाने विरहाविषयी सांगतात की लोक प्रेमाच्या गप्पा मारतात, पण खरे प्रेम म्हणजे काय हे समजून घेत नाहीत, विरह म्हणजे काय

हे समजून घेत नाहीत, केवळ विरह हा शब्द उच्चारण करून सोडून देतात. फरीद साहेब म्हणतात हे चुकीचे आहे. विरहाशिवाय कोणीही सतगुरूंनी दिलेल्या नामाचे स्मरण करू शकत नाही, सेवा करू शकत नाही. सत्य हे आहे की, हे विरह! लोक जे काही तुला समजतात ते खरे नाही. तू तर सर्वांचा चक्रवर्ती बादशहा, महाराज आहेस. ज्या देहात विरह निर्माण होत नाही, तो देह प्रेतासमान आहे. गुरू गोविंद सिंहजी महाराज सांगतात:

***कहाँ भयो जो दो लोचन मूँदके बैठ रहयो वक ध्यान लगायो ।***
***न्हात फिरे जो सात समुद्र लोक गयो परलोक गवायो ।***
***साच कहो सुण लेहो सभे जन जिन प्रेम कियो तिन ही प्रभ पायो ।।***

केवळ बगळ्यासमान समाधीस्थ होणे म्हणजे ध्यान–अभ्यास नाही. जर अंतरामध्ये प्रेम नसेल तर मन कधी समाधीचा भंग करतो हे आपल्या लक्षातही येणार नाही. सर्वप्रथम प्रेम असणे गरजेचे आहे.

एक महात्मा चांगला ध्यान–अभ्यास करणारा सत्संगी होता. त्याच्या अंतर्यामध्ये सतगुरू प्रगट झाल्यावर तो खुष झाला. सतगुरूंनी त्यास विचारले, ''बोल तुला काय हवे? तू यावेळी जे काही मागशील ते मी येथे हजर करीन. तुला संसारी सुख हवे? तुला राजा बनवू का?'' तो महात्मा म्हणाला, ''नको! तुम्ही जर माझ्यावर प्रसन्न झाला असाल, तर मला तुमची गरज नाही. मला केवळ तुमचा दुरावा, तुमच्या विरहाची गरज आहे. मला तुमचा विरह द्यावा जेणेकरून मी तुमची आठवण करीत राहीन. तुम्ही मला भेटला नाहीत तरी चालेल.''

***कद्र बिछोड़े दी ओह जाणें, जेहड़ा बिछुड़े अपने यार कोलों ।***
***तंदुरूस्त नूं सार की दुखड़े दी, दुख पुछिए किसे बीमार कोलों ।।***

महाराज सावन सिंहजींना त्यांचे गुरू बाबा जयमल सिंहजींच्या विरहाच्या वेदना होत्या. महाराज सावनजींचा आदर–सन्मान करणारे असंख्य लोक होते, परंतु हे एक सत्य आहे की आपण बसल्या–बसल्या सतगुरू विरहामध्ये

रुदन करीत असत. आपण इतके रूदन करीत असत की अनेक लोकांनी आपणांस शांत करण्याचा प्रयत्न करूनही आपण शांत होत नसत. अशाच प्रकारे त्यांचे प्रिय पुत्र, महाराज कृपाल सिंहजींना त्यांच्या विरहाचे दु:ख होते. ते जेव्हा कधी बाहेर जात व महाराज सावन सिंहजींचा विषय निघे, तेव्हा त्यांच्या नेत्रांमधून आपोआपच अश्रू बाहेर पडू लागत.

आजदेखील तुम्ही पाहू शकता की, ज्यांच्या हृदयामध्ये त्यांचा विरह, प्रेम, वेदना आहेत, ते लोक अजूनही इतरांना नेत्रांमधील अश्रू न दर्शविता, अंतरामध्येच रूदन करतात. सत्य हे आहे की, जोपर्यंत अश्रू पुसणारा जवळ बसलेला नसेल, तर रडण्याचे समाधानच मिळत नाही. जेव्हा आपण अंतर्यात गुरूंना प्रगट करून घेऊ तेव्हाच रडण्याचे समाधान मिळेल. एकमेकांकडे पाहून अश्रू ढाळण्याचा काय उपयोग?

फरीद साहेब सांगत आहेत,''माझे शरीर विरहामुळे जळत आहे. त्यावर एकच मलम आहे, ते म्हणजे सतगुरूंचा विरह, त्यांचे प्रेम आणि त्यांची भेट.'' त्यामुळे फरीद साहेब त्यांच्या वाणीद्वारे आपणांस आपले लक्ष या बाह्य जगातून काढून, अंतर्यात जाण्यास सांगत आहेत. बाहेर जंगल-पर्वतांवर फिरून किंवा एखाद्या धर्मस्थानी जाऊन आपला परमेश्वर प्राप्तीचे ध्येय साध्य होणार नाही, आपले ध्येय या शरीररूपी खऱ्या हरिमंदिरामध्ये दाखील होऊनच साध्य होणार आहे. गुरू अमरदेवजी महाराज सांगतात:

***हरि मंदिर ऐहो शरीर है ज्ञान रतन प्रकट होय ।***

खरे हरिमंदिर हे आपले शरीरच आहे. परमात्म्याच्या मिलनाचे ज्ञान आपणांस अंतर्यामध्ये जाऊनच होणार आहे. त्यामुळे आपलेदेखील कर्तव्य आहे की, आपण महात्म्यांच्या सांगण्यानुसार आपले जीवन व्यतीत करावे, आत्म्यास पवित्र करावे, जेणेकरून आपण परमात्म्यास भेटू शकू.

***

# प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
सांपला, हरियाणा – ११ फेब्रुवारी १९९७

**एक प्रेमी** :– प्रिय महाराजजी, मी ऐकले आहे की आपण बालपणी काही गुरूप्रेमावर भजने लिहीली आहेत, जी भजने आम्ही नेहमी गातो. ज्यावेळी आपण ही भजने रचू लागलात त्यावेळी आपले वय किती होते? आम्हांस हे देखील सांगा की आपणांस इतकी सुंदर आणि भक्तीभावाची भजने रचण्याची प्रेरणा कोठून मिळाली?

**बाबाजी** :– बंधूंभगीनींनो, आपणांस माहित आहे की मी आपल्या जीवनाचा हिशोब किंवा तारखा लक्षात ठेवल्या नाहीत. मी किती दौरे केलेले आहेत वा आम्ही कोणत्या दिवशी या दौऱ्यांवर गेलो होतो याविषयी जर आपण मला विचारलेत तर माझ्याकडे या तारखांचा हिशोब नाही. गेल्या वर्षी मला रसेल परकिन्स भेटला व म्हणाला, वीस वर्षांपूर्वी आजच्या दिवशी आपण प्रथम भेटलो होतो, मी त्याचे आभार मानले की तू मला आठवण करून दिलीस.

मला माझा जन्मदिवस देखील यासाठी आठवण राहिला की माझी आई नेहमी माझा जन्मदिवस साजरा करीत असे. ती जवळ–जवळ गावातील सर्वच मंडळींना बोलावून त्यांस भोजन खाऊ घालीत असे. मी नेहमी सांगतो की माझ्या आईच्या अंतरात खूप भक्तीभाव होता. मला माहित नाही की तिचे गुरू कोण होते पण असे वाटायचे की तिचे कोणी गुरू आहेत. ती खूप ध्यान–अभ्यास करीत असे. तिने मला खूप प्रेम दिले व माझे पालनपोषण खूप चांगल्या रीतीने केले, खरेतर मी तिच्या पोटी जन्म घेतला नव्हता.

माझी आई आपल्या जीवनविषयक तत्वांच्या ज्ञानासंबंधी सांगत असे की हा संसार एका स्वप्नाप्रमाणे आहे, इथून कोणतीही वस्तू आपल्या सोबत

जाणार नाही. केवळ तोच उत्तम ठरेल जो नामाचा जप करून आपले जीवन सफल बनवेल. जे अमृतवेळेवर उठत नाहीत त्यांचे भाग्य अनिष्ट आहे. मी जेव्हा पहाटे लवकर उठत असे, तेव्हा माझी आई नाराज होत असे व मला विचारत असे की,''तू पहाटे लवकर का उठतोस?'' मी तिला सांगायचो,''तू स्वत:च तर म्हणतेस की जे अमृतवेळी झोपतात त्यांचे अनिष्ट भाग्य असते.''

प्रेमींनो, बालकावर त्याच्या आईचा खूप प्रभाव असतो. मला परमात्म्याची भक्ती करण्याची प्रेरणा आपल्या आईकडून वारसा म्हणून मिळाली. प्रत्येक आईचे स्वप्न असते की आपला मुलगा चांगला व नेक असावा. जे मुलांवर प्रेम करतात मी त्यांच्यावर अंत:करणापासून प्रेम करतो. जे मुलांना मारतात त्यांस पाहून मला आश्चर्य वाटते व खूप वाईट देखील वाटते. मी बालपणी जे भजन लिहिलेले होते त्या भजनातील एक हृदयस्पर्शी व वेदनात्मक कडवे हे होते की:

***इक ना लिखीं मेरे सतगुरु दा विछोडा। भावें छुट जाए सारा संसार लिख दे।।***

परमेश्वरा भले आमचा सर्व संसारापासून जरी विरह झाला तरी आमच्या नशिबी आमच्या गुरूंचा विरह लिहू नकोस, तो झेलणे फारच कठीण आहे. मी ह्या कटूसत्याला आपल्या जीवनात दोनदा अनुभवले आहे. बाबा बिशनदासजींनी जेव्हा देह सोडला तेव्हा त्यांचा विरह माझ्या हृदयात छेद करून गेला. जेव्हा परमात्मा कृपाल संसारात माझ्या डोळ्याआड झाले, तेव्हा माझी अवस्था एखाद्या वेड्या मनुष्या प्रमाणे झाली होती.

मला बालपणापासूनच ज्योत व नादाचा अनुभव होत असे. मी या भजनात उल्लेख केलेला आहे की माझ्या कपाळावर गुरूंची ज्योत लिही व माझ्या कानांत धुनात्मक आवाज लिही. ती ज्योत व नाद ऐकण्यासाठी पवित्र आत्म्यात दिवस-रात्रीचा फरक पडत नाही, परंतु जोपर्यंत त्या ज्योतीविषयी व नादाविषयी कोणी मार्गदर्शन करीत नाही, जोपर्यंत एखादे परिपूर्ण गुरू त्यास अंतर्यातून जागृत करीत नाहीत, तोपर्यंत नाद त्यास वर खेचू शकत नाही.

मी नेहमी सांगतो की जर आपल्या घरात सोने, हिरे, मोती गाढून ठेवलेले असले व आपण बाहेर कवडी-कवडी मागत फिरत असाल तर आपणांस त्या सोने, मोती, हिऱ्यांचा काय फायदा? जर आपणांस आपल्या घरातील खजिन्याचे रहस्य जाणणारा भेटला, त्याने आपणांस सांगितले की जर आपण या जागी खोदलेत तर आपणांस इथून मौल्यवान खजिना सापडेल!आपण चांगले जीवन जगू शकाल. आपण विचार करून पहा, काय आपण सोने, मोती, हिऱ्यांचा धन्यवाद कराल की ज्याने ते प्राप्त करवून दिले त्याचा धन्यवाद कराल?

याचप्रमाणे परमात्मा ज्योतीरूपात आणि नादरूपात आपल्या सर्वांच्या अंतर्यात विराजमान आहे, परंतु त्याचे अस्तित्व असूनही आपण कित्येक वेळा जन्म-मरणाच्या चक्रात फिरत राहिलो, आपण त्या परमात्म्यापासून फायदा घेतला नाही. जेव्हा आपल्या घरच्या खजिन्याचे रहस्य जाणणारे परमात्मा कृपाल भेटले, तेव्हा आम्ही त्यांपासून फायदा घेतला. म्हणून मी रात्रंदिवस त्या परमात्म्या कृपालजींचा धन्यवाद करतो की त्यांनी आम्हा बाह्यजगात कवडी-कवडी मागणाऱ्यांना, विषय-विकारांमध्ये गुंतलेल्यांना आपल्या सोबत जोडले, आम्हांस आपल्या खऱ्या घराचे, सचखंडाचे गुपीत सांगितले आणि आपल्या घरी रहाण्यासाठी जागा दिली.

मला एखाद्या स्वप्नाप्रमाणे आठवण आहे की मी जेव्हा सात-आठ वर्षांचा होतो. मी आपल्या घरातील सर्व सदस्यांच्या नावे मातीचे ढीग बनविले. मी त्यातील प्रत्येक ढीगाशी प्रश्न केला की जेव्हा माझा अंतसमय येईल तेव्हा तू माझे रक्षण करशील का? अंतर्यातून माझ्या आत्म्याने उत्तर दिले की तुझे रक्षण करणारा यांपैकी कोणीही नाही. त्यावेळी माझा आत्मा तळमळत असे की माझे काहीतरी हरवलेले आहे. मी सर्व ढीग पाडून टाकले व केवळ एका ढीगापुढे नमस्कार केला की मला केवळ तुझाच आसरा आहे, तू जिथे असशील तिथून येऊन मला भेट.

माझे वडिल ते माझे कुतुहलकारक कृत्य पहात होते. त्यांनी मला विचारले,''तू हे काय करीत होतास?'' मी त्यांस सांगितले की,''मी आपल्या सर्वांच्या नावे एक-एक ढीग तयार केले व प्रत्येकास प्रश्न केला की काय तुम्ही माझ्या मृत्युसमयी येऊन माझे यमदूतांपासून रक्षण कराल? परंतु सर्वांकडून एकच उत्तर मिळाले की तुझी मदत कोणीही करणार नाही. बाकी सर्व ढीग पाडून मी (गुरूंचा) एक ढीग ठेवला व त्यापुढे नमस्कार केला की मी तुला ओळखत नाही, तुझ्यासाठी माझा आत्मा तळमळत आहे, तू जिथे आहेस तिथून येऊन मला भेट.''

माझे वडिल खूप भावूक होऊन म्हणू लागले,''मी तुझ्यासाठी इतकी मालमत्ता जमवलेली आहे, चांगले घर बनविलेले आहे, मी तुझी मदत करु शकत नाही?'' मी म्हणालो,''माझा प्रश्न तर अंतर्यातील विषयावर आहे, काय तुम्ही तिथे याल?'' वडिल म्हणाले,''हे तर कठीण आहे. त्यावेळी मी स्वत:चाच बचाव करू शकणार नाही.'' त्यावेळी मी आठ वर्षांचा होतो. मी त्याचवेळी त्यांच्या मालमत्तेवर थुंकलो की बाह्यजगातील ही मालमत्ता व संपत्ती माझ्यासाठी थुंकेसमान आहे.

प्रियजनहो, मालमत्तेचे तर मला बालपणापासूनच ओझे राहिले नाही, मी मालमत्तेस कवड्यांसमान देखील समजलो नाही. मला तर बालपणापासूनच परमात्म्याचा शोध होता. मला लहानपणापासूनच भजन लिहिण्याची सवय होती. मी अनेक भजने लिहिली होती परंतु मी तो भजनांचा साठा जपून ठेवला नाही कारण मी अनेक घरे बदलली, अनेक जागी स्थलांतर केले. मी ज्या जागी जात असे, केवळ आपले कपडे घेऊनच जात असे. जोपर्यंत परमात्मारूप गुरू भेटले नाहीत, तोपर्यंत मला ते आवडतच नसत, रात्रंदिवस केवळ त्यांच्या भेटीचीच तळमळ लागलेली होती.

***